# प्रकरण सहावे

## उपसंहार

६.१ मूल्यमापन

६.२ नागरी बँकांच्या कार्यपध्दतीविषयी काही सूचना

६.३ श्री. महावीर को-ऑप. बँकेसाठी काही सूचना

६.४ सारांश

## प्रकरण सहावे

## उपसंहार

आपल्या राष्ट्रीय उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी नागरी सहकारी चळवळ फार महत्वाची आहे. सहकारिता ही आमच्या भारतीय जनजीवनात मोठया प्रमाणात रुजलेली आहे. आज ५ लाखांपेक्षा अधिक विविध स्वरूपाच्या सहकारी संस्था विविध क्षेत्रात कार्यरत असून त्यांची सदस्य संख्या जवळजवळ १५ कोटींच्या वर आहे.

देशातील ६० टक्के छोटे शेतकरी, १० ते १५ टक्के मध्यमवर्गीय, मजूर, गिरणी कामगार, छोटे व्यापारी इत्यादींना निरनिराळया सहकारी नागरी क्षेत्रांच्या द्वारे लाभ होतो. इतके विशाल क्षेत्र जगातील कोणत्याही देशात सहकारी चळवळीने व्यापलेले नाही ही भारतीयांच्या दृष्टीने गौरवाची बाब आहे. सहकारी चळवळीचे डावे, उजवे हात म्हणून सहकारी साखर कारखाने आणि नागरी सहकारी बँका यांचा उल्लेख प्रामुख्याने भारतात सर्वत्र केला जातो. सर्वसामान्यापासून श्रमाचे मंदिर उभारण्यासाठी नागरी बँकेची चळवळ ही कामधेनूसारखी आदर्श चळवळ आहे.

भारतात नागरी सहकारी बँकेच्या चळवळीची मुहूर्तमेढ १८८९ मध्ये बडोदे येथे रोवली गेली. `अन्योन्य सहकारी मंडळी` या परस्पर साहाय्यक पहिल्या नागरी सहकारी बँकेचा शताब्दी समारंभ अलिकडेच फार मोठया उत्साहाने साजरा करण्यात आला.

सन १९८७ च्या अखेरीला भारतात, ३,०६४ शाखा असलेल्या १,२६३ नागरी सहकारी बँका होत्या. त्यापैकी ११ बँकांना सूचित बँकांचा दर्जाही देण्यात आला आहे. तसेच काही बँका परकीय चलनाचे विनिमय व्यवहारही करतात. मार्च १९८७ आखेर भारतातील नागरी बँकांच्या ठेवीत ४,४७२ कोटी

रूपयापर्यन्त व कर्ज व्यवहारात ३,६७८ कोटी रूपयापर्यन्त वाढ झाली आहे. देशाचे आर्थिक नियोजनात सहकारी बँकांचे स्थान अनन्य साधारण आहे.

नागरी सहकारी बँक चळवळीत महाराष्ट्र राज्य अग्रेसर आहे. कारण एकूण नागरी बँकापैकी ३८४ (२८ टक्के) बँका व एकूण शाखांपैकी १,३१७ (४३ टक्के) शाखा एकट्या महाराष्ट्रात आहेत. विशेषत: महाराष्ट्रात व महाराष्ट्रातील पश्चिम विभागात नागरी सहकारी बँकांचे केंद्रिकरण झालेले आहे. महाराष्ट्रातील पुणे, कोल्हापूर आणि कोकणातील ठाणे, मुंबई हे जिल्हे वगळता इतरत्र नागरी बँकांचा फारसा विकास झालेला नाही. मराठवाडा आणि विदर्भात विकासाला अजूनही फार मोठी संधी उपलब्ध आहे असे मत राज्याचे सहकार आयुक्त व्ही.एस. गोपालकृष्णन् यांनी व्यक्त केले आहे.

कोल्हापूर जिल्हात सन ज्ञ १९१३ मध्ये ` दि कोल्हापूर अर्बन को-ऑप. बँक लि. ` ही पहिली नागरी सहकारी बँक स्थापन झाली. सन १९८७ अखेर त्यांची संख्या ४२ झाली. त्यापैकी कोल्हापूर शहरात १५ नागरी सहकारी बँका आपले कार्य करीत आहेत.

जिल्ह्यातील एकूण ४२ नागरी सहकारी बँकामध्ये सर्वात जास्त सभासद संख्या ` दि कोल्हापूर मराठा को-ऑप. बँकेची ` आहे. खेळते मांडवल ठेवी आणि कर्ज वितरण या तीनही बाबीत इचलकरंजी जनता सहकारी बँकेने जिल्हात उच्चांक प्रस्थापित केला आहे. तर राखीव निधी, नफा व शाखा विस्तार या तीन बाबीत श्री. वीरशैव को-ऑप. बँकेने उच्चांक गाठला आहे. वसूल भाग भांडवलाच्या बाबतीत मात्र ` दि प्राथमिक शिक्षक सहकारी बँक जिल्हात आघाडीवर आहे. एकंदरीत नागरी सहकारी बँकांच्या संख्येच्या बाबतीत महाराष्ट्रात (मुंबईनंतर) कोल्हापूर जिल्हाचा दुसरा क्रमांक लागतो. तर शाखा विस्ताराबाबत तिसरा क्रमांक लागतो. या जिल्हाच्या सर्वांगिण विकासासाठी अजूनही दुर्लक्षिलेल्या भागात नागरी सहकारी बँका स्थापनेची गरज आहे.

कोल्हापूर शहरात ११ मे, १९३७ रोजी श्री. महावीर को-ऑप. बँकेची स्थापना झाली. शहरात स्थापन झालेल्या १५ बँकापैकी ही एक जुनी बँक आहे. श्री. बळवंत शांताप्पा मिठारी यानी सुरुवातीला लक्ष्मीपुरी, कोल्हापूर येथे बँकेची स्थापना केली. या बँकेची उत्तरोत्तर प्रगती होत जाऊन बँकेने कोल्हापूर शहरात व जनमाणसात एक महत्वाचे स्थान प्रस्थापित केले आहे. बँकेच्या सभासद संख्येत काही अपवादात्मक वर्षे वगळता सातत्याने वाढच झाली आहे. तसेच ठेवी, कर्ज वितरण, भाग भांडवल, खेळते भांडवल यामध्ये सातत्याने वाढ होत गेल्याचे दिसते. बँकेने प्रथम पासूनच काटकसरीने व्यवसाय केल्याने स्थापनेच्या पहिल्या वर्षापासूनच बँकेला नफा मिळाला आहे. व त्याचा लाभ बँकेच्या सभासदांना लाभांश रूपाने सुरुवातीपासूनच झालेला आहे. बँकेचे एकूण कामकाजही समाधानकारक असल्याने बँकेला ` सतत ` अ ` वर्ग मिळाला आहे.

सुरुवातीपासूनच बँकेने थकबाकीचे प्रमाण कमी ठेवण्यात यश मिळविले आहे. मध्यंतरीच्या काळात जरी थकबाकी वाढलेली असली तरी शेवटी १९९०-९१ मध्ये थकबाकीचे प्रमाण फक्त ८.३ टक्के राहिले आहे. इतर बँकांच्या तुलनेने हे प्रमाण बरेच कमी आहे.

सध्या बँकेच्या प्रधान कार्यालया व्यतिरिक्त दहा शाखा कार्यरत आहेत. व अलिकडेच आचार्य विद्यानंद भवन, वैशाली परिसर, कोल्हापूर येथे शाहुपूरी शाखेचा विस्तार कक्ष सुरु केला आहे. अजूनही नवीन शाखा सुरु करण्याचा बँकेचा मानस आहे.

थोडक्यात श्री. महावीर बँकेची सक्षमता, लाभप्रदता, उत्पादकता चांगली असलेली दिसून येते.

६.१ मूल्यमापन :

नागरी सहकारी बँकांच्या कार्य वैशिष्टयामुळेच त्यांची लोकप्रियता वाढली आहे. एवढेच नव्हे तर काही नाविण्य निर्माण करण्यास या क्षेत्रात भरपूर वाव आहे. प्रस्तुत अभ्यासावरून खालील गोष्टी नमूद कराव्याशा वाटतात.

१) नागरी बँका रोजगाराभिमुख कर्ज देण्यावर विशेष भर देत असून स्वयंम् रोजगार निर्मिती करणाऱ्या कारखानदार, कुटिरोद्योग, मोठे व्यापारी, ट्रक, टेम्पो, रिक्शा आदींना शक्य तो कर्ज देण्यात प्रयत्नशील आहेत. तरीसुध्दा नागरी बँकेच्या संचालक मंडळींच्या हितसंबंधी व जवळपासच्या नजीकच्या सभासदांची कर्जाची प्रकरणे तातडीने मंजूर केली जातात. असा सर्वसाधारण विरोधी सूर आहे. सहकार क्षेत्र हे जवळपास शासकीयच असून नागरी सहकारी बँकेवर रिझर्व बँकेचा वरचष्मा असला तरी नागरी सहकारी बँक जवळजवळ अडत्याचेच काम करतात अशी टीका नामवंत अर्थतज्ञ वि.म.दांडेकर यांनी केली आहे.

२) नागरी बँकेस कार्य करण्यासाठी फार मोठे क्षेत्र उपलब्ध आहे. त्या दृष्टीने त्यांनी राज्य सरकार व केंद्र सरकारच्या विविध योजना सुध्दा आपल्या बँकिंग क्षेत्रात सहभागी करून घेऊन कार्य करण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे.

३) राज्य सरकार व केंद्र सरकारच्या काही विशिष्ट कर्ज माफीच्या धोरणामुळे कर्ज रक्कम व कर्जावरील व्याजही माफ करण्याच्या आदेशामुळे सरकार जर शेतकऱ्यांना कर्ज माफी करू शकते तर पुढे-मागे आपणालाही नागरी सहकारी बँकेची कर्ज माफी मिळू शकेल अशी भावना व धारणा अनेक सभासदांची झाली आहे. त्यामुळे अलिकडे थकबाकीचे प्रमाण बरेच वाढत असल्याचे दिसते.

४) नागरी सहकारी बँकांना, राष्ट्रीयकृत बँकेपेक्षा ठेवीवर एक टक्का जादा व्याज देण्याची सवलत असल्यामुळे मोठया प्रमाणात ठेवी संकलीत करता आल्या. आता हे प्रमाण फक्त अर्धा टक्का ठेवण्यात आले आहे. त्यामुळे नागरी बँक च्याकडील ठेवींचे प्रमाण कमी होऊ लागले आहे. तसेच, राष्ट्रीय बचत योजना, राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे, युनिट ट्रस्ट, आयुर्विमा निगम सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी यासारख्या आयकरातील सवलतीच्या योजनांमुळेच नागरी बँकाकडील ठेवींचे प्रमाण कमी झाले आहे. याबरोबरच भांडवली बाजारातील शेअर, इंदिरा विकासपत्रे, किसान विकासपत्रे, यासारख्या कमी कालावधीत जास्त लाभ देणाऱ्या योजनेकडे ठेवीदार आकर्षित झाल्याने नागरी बँकांच्या उंबरठयावरून ते माघारी फिरू लागले आहेत.

सन १९९१-९२ या वर्षाच्या अंदाजपत्रकात ठेवीवरील व्याजातून करकपात व कर्जावरील व्याजावर ३ टक्के कर आकारणी ही दोन्ही बंधने नागरी सहकारी बँकांना लागू करण्यात आली. या नवीन बंधनामुळे बँकामध्ये येणाऱ्या ठेवींचे प्रमाण बरेच कमी झाले. कर्जावरील व्याज दर भरमसाठ वाढविल्यामुळे थकबाकीचे प्रमाण वाढू लागले. म्हणजे या धोरणामुळे नागरी सहकारी बँकावर एकप्रकारचे अरिष्टच आले होते. त्यामुळे सन १९९२-९३ च्या अंदाजपत्रकात हे बंधन रद्द केले आहे. तरीसुध्दा गेल्या वर्षभरात नागरी सहकारी बँकांच्या कामकाजावर बराच प्रतिकूल परिणाम झाला हे मान्य करावे लागेल.

५) नागरी सहकारी बँकांच्या, संचालक मंडळाच्या निवडणुकीत सत्तेच्या स्वार्थाच्या पूर्तीसाठी अलिकडे जी राजकीय गटबाजी निर्माण होऊ लागली आहे, त्यामुळे या चळवळीचे स्वरूप कदाचित वेगळे वळणही घेऊ शकेल. विशेषत: निवडणूक अधिकारी प्रमुखाला हाताशी धेऊन वाटेल ते गैरप्रकार करण्याचा डाव काही अतिरेकी झुंडशाही वृत्तीचे संचालक करतात. त्यांच्यावर कडक नियंत्रण ठेवले गेले पाहिजे. अन्यथा सहकाराचे मूळ तत्वच नाहीसे होऊ शकेल.

६) नागरी बँकांच्या शाखा विस्ताराबाबत रिझर्व बँकेचे धोरण आडमूठेपणाचे आहे. कारण १९८५ ते १९९० या पाच वर्षात देशातील एकूण ३३५ नागरी सहकारी बँकांना केवळ ४१० शाखा उघडण्यास परवानगी दिली आहे.

तसेच गेल्या २५ वर्षांत व्यापारी बँकांच्या शाखांची ज्या प्रमाणात वाढ झाली त्या प्रमाणात नागरी सहकारी बँकांची वाढ ही फारच अल्प आहे. व्यापारी बँकांची या काळात ६० टक्के शाखा वाढ ही ग्रामीण भागात झाली आहे. या अनुषंगाने नागरी भागात नागरी बँकांना मात्र प्राधान्य दिलेले नाही. यामुळे या बँक ग्राहकांची गैरसोय होत आहे. तेव्हा नवीन शाखा उघडणे व शाखा स्थलांतर यावरील बंधने शिथिल करावीत.

७) रिझर्व बँकेच्या सुचनेनुसार बहुतांश नागरी सहकारी बँकांनी अग्रक्रम क्षेत्राचे उद्दिष्ट पूर्ण केले आहे. परंतु इतर बँकासाठी अग्रक्रम कर्जाचे प्रमाण ४० टक्के तर नागरी बँकासाठी ६० टक्के हा भेदभाव बरोबर नाही.

तसेच अग्रक्रम क्षेत्रासाठी द्यावयाचे कर्जाचे बंधन हे राष्ट्रीय धोरणास अनुसरून योग्य असले तरी त्यामध्ये अंतर्भाव असलेल्या कर्जाचे प्रकारात व अटी-मध्ये बदल करण्याची गरज आहे.

८) सध्या नागरी सहकारी बँकांची चळवळ काही दृश्य व अदृश्य अशा संकटांच्या छायेत आहे. या चाहुलीचे गांभीर्य शासनाने, विशेषत: देशाचे आर्थिक धोरण ठरविणाऱ्या रिझर्व बँकेने व सहकार खात्याने समजावून घेऊन त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी प्रामाणिकपणे लक्ष दिल्यासच नागरी बँकांच्या विकासाची विजयी पताका गौरवाने फडकत राहील.

६.२ नागरी बँकांच्या कार्यपध्दतीविषयी
काही सूचना :

१) सरकार ज्या सहकारी संस्थांना मदत देत नाही त्या संस्थेचे लेखा परीक्षण हे मान्यता प्राप्त लेखा परीक्षकाकडून करुन घेण्याची मुभा दिल्यामुळे अनेक नागरी सहकारी बँकांचे भवितव्य उज्ज्वल होऊ शकेल. त्यामुळे थांबलेले लेखा परीक्षण आता वेगाणे होईल. रिझर्व बँकेने दुर्बल घटक व अग्रक्रम क्षेत्रासाठी टाकलेली जबाबदारी नागरी बँकांनी पूर्ण केली तर सामाजिक व आर्थिक न्याय प्रस्थापित करण्यात सरकारी धोरणास नागरी बँकामुळे पुष्टी मिळेल.

२) महाराष्ट्र बँकेचे माजी अध्यक्ष व अर्थतज्ज्ञ डॉ. एम.व्ही.पटवर्धन यानी सहकारी चळवळीबाबत भाष्य करताना असे म्हटले आहे की, " खरे तर सहकारी चळवळ आता बाजूलाच राहिली असून, आता त्याचे व्यापारीकरण झाले आहे." हाच फार मोठा धोका नागरी बँकेच्या विकासातील अडसर आहे. तो दूर करण्याचा सर्वांनी प्रामाणिकपणे प्रयत्न केला पाहिजे.

३) नागरी सहकारी संस्थातील वाढत्या गैरप्रकाराविषयी वेळीच योग्य त्या उपाययोजना करुन भ्रष्टाचार रोखला पाहिजे. त्याबाबत संचालक मंडळांनी सभासदांच्यातून प्रत्येक नागरी बँकेतून दक्षता समिती नेमल्यास संचालक मंडळाचा कारभार नि:पक्षपाती होऊन अन्यायी स्वरुपाचा राहणार नाही. नागरी बँकेचा प्रशासकीय खर्च जादा होणार नाही याची काळजी घेऊन बँकेच्या स्टेशनरीचा गैरवापर केला जाणार नाही याबाबत दक्षता घेतली गेली पाहिजे.

४) नरसिंव्हन समितीच्या शिफारशीनुसार बँकींग व्यवसायात जे बदल घडणार आहेत, त्यामुळे बँकींग क्षेत्रात जी जीवघेणी स्पर्धा चालू होणार आहे त्या स्पर्धेला नागरी सहकारी बँकांना तोंड द्यावे लागणार

आहे. मात्र या समितीच्या शिफारशी लागू होण्यापूर्वी, नागरी सहकारी बँकांच्या पायातील रिझर्व बँकेच्या व सहकार खात्याच्या बेड्या तोडून टाकाव्या लागतील, त्याशिवाय ही खुली स्पर्धा होणार नाही.

रिझर्व बँकेने आणि शासनाने नागरी सहकारी बँकांना जोपर्यंत खाजगी बँकांच्या दोत्राइतका खुलेपणा दिलेला नाही, तोपर्यंत या देशात नरसिंव्हन समितीच्या शिफारशी अंमलात आणू नयेत, अशी मागणी नागरी सहकारी बँकांना करावी लागेल.

५) नागरी बँकांचा अहवाल ताळेबंद सभासदाना दिला जातो तसेच ताळेबंद वृत्तपत्रात प्रसिध्द करावा लागतो. वृत्तपत्रात असा ताळेबंद प्रसिध्द करण्याऐवजी ठेवीदारास पाहाण्यासाठी मुख्य कचेरीत उपलब्ध होण्याची मुभा असावी, अशी तरतूद बँकींग रेग्युलेशन ॲक्टमध्ये केल्यास बँकांच्या खर्चाच्या दृष्टीने सोयीचे होणार आहे.

६) बँकांच्या व्यवस्थापनात सुधारणा करून ते जास्तीत जास्त व्यावसायिक करावे.

७) निधीचा विनियोग जास्तीत जास्त कुशलतेने करून उपलब्ध असलेल्या जादा रोख निधीची गुंतवणूक रोज तपासून पाहाणे.

८) दैनंदिन व्यवहाराकरिता आवश्यक असलेल्या रोख निधीचे प्रमाण हे किमान ठेवावे. शक्यतो ते तीन टक्क्यांपेक्षा जास्त जाऊ देऊ नये.

९) प्रत्येक बाबतीत व्यवहार हा लेखा परीक्षणाकरिता ठरवून दिलेल्या दक्षता प्रमाणाचे बाहेर जाणार नाही याकरिता काळजी घेणे. दर तीन वा सहा महिन्यांनी यासंबंधीचे पत्रक तयार करून ते संचालक मंडळाच्या माहितीसाठी ठेवणे.

१०) लेखा परीक्षक हे सर्व सभासदांचे प्रतिनिधी म्हणून संस्थांचे हिशोब तपासतात. त्यांना जी फी सहकारी कायद्याने दिली जाते ती फारच कमी आहे. त्यामुळे उच्च (योग्य) दर्जाची तपासणी होत नाही. रिझर्व बँकेने याबाबतीत राज्य शासनाला मार्गदर्शक सूचना द्याव्यात.

११) थकबाकीचे प्रमाण मर्यादित ठेवण्यासाठी रिझर्व बँकेने स्वास्थ्य संहिता सुरू केली आहे. ती अधिक प्रभावी आणि तेही बँकींग रेग्युलेशन अँक्टचे अंतर्गत राहून करावे. त्याचा निश्चितपणे उपयोग होऊ शकेल.

१२) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व राज्य सहकारी बँका या प्रामुख्याने शेती पतपुरवठा करणाऱ्या संस्थांशी जोडल्या गेल्या आहेत. परिणामी नागरी बँकांकडे दुर्लक्ष होत आहे. यातूनच नागरी सहकारी बँकांसाठी स्वतंत्र शिखर बँक असावी अशी मागणी महाराष्ट्रात पुढे आली आहे.

तसेच वाढत्या शहरीकरणामुळे ग्रामीण भागातील सर्व समस्या आज शहरी वातावरणातही निर्माण झाल्या आहेत. नागरी लोकसंख्येच्या समस्या, नागरी सहकारी बँकांचे कार्य व नागरी सहकारी बँकांची स्वतंत्र शिखर बँक ही आज काळाची गरज आहे. मात्र रिझर्व बँकेचे या बँकांच्या बाबतीतील धोरण आडमुठेच राहिले आहे. अशावेळी स्वतंत्र शिखर बँके-विषयी महाराष्ट्र शासनाने पुढाकार घ्यावा अशी राज्यातील नागरी सहकारी बँकांची अपेक्षा आहे.

१३) नागरी सहकारी बँका हा एकूण बँकींग व्यवसायाचे एक अंग असलेने राष्ट्रीयीकृत बँकांनी संगणक यंत्राचा वापर करून कामकाजात आधुनिकता निर्माण केल्यानंतर नागरी सहकारी बँका त्यापासून दूर राहूच शकणार नाहीत.

संगणक यंत्राचे कामकाजामुळे ग्राहकास तत्पर सेवा देता येते, कमीतकमी वेळेत जास्तीत जास्त उत्कृष्ट सेवा कशी मिळेल याकडे ग्राहकांचे लक्ष असते. म्हणून बँकांच्या कामकाजात आधुनिकता आणून तत्पर ग्राहक सेवा देता येईल. या दृष्टीकोनातून बँकांनी वेळीच निर्णय घेणे आवश्यक आहे.

१४) नागरी बँकेचा विकास घडवून आणण्यासाठी प्रभावी रचनात्मक नेतृत्व, कार्यक्षम व्यवस्थापन आणि जागरूक सभासद या त्रिसूत्री धोरणाच्या द्वारे मार्ग आखून कार्यवाही केली पाहिजे. हीच यशस्वी नागरी सहकारी बँक चळवळीची गुरुकिल्ली आहे.

६.३ श्री. महावीर को-ऑप. बँकेसाठी
काही सूचना :

१) सन १९८७ अखेर कोल्हापूर जिल्हात एकूण ४२ नागरी सहकारी बँका स्थापन झाल्या. त्यामध्ये दहाव्या क्रमांकाला श्री. महावीर को-ऑप. बँकेची स्थापना झाली. बँकेने आपला व्यवसाय समाधानकारक केल्याने बँकेला सतत 'अ' वर्ग मिळाला आहे. मात्र या बँकेनंतर स्थापना होऊनही काही बँकांनी विशिष्ट क्षेत्रात भरीव प्रगती केली आहे. काही विशिष्ट बाबीत त्यांनी जिल्हात उच्चांक प्रस्थापित केला आहे. सारणी क्रमांक ३.६ वरून हे लक्षात येते. या पार्श्वभूमीवर विचार करता श्री. महावीर बँकेने अजूनही सर्वच क्षेत्रात प्रगती व्हावी या दृष्टीने प्रयत्न केल्यास निश्चितपणे त्याचा लाभ होऊ शकेल.

२) श्री. महावीर को-ऑप. बँकेच्या सध्या दहा शाखा कार्यरत आहेत ही बाब उल्लेखनीय आहे. मात्र बँकेला आपला व्यवसाय वाढविण्याच्या दृष्टीने आजही इचलकरंजी, हुपरी, शिरोली, गोकुळ शिरगांव, एम.आय. डी.सी. या उद्योग-व्यापारांच्या ठिकाणी शाखा स्थापन करून बँकेचा विस्तार करणे व आपल्या कर्जातील उत्पादक कर्जाचे प्रमाण वाढविणे आवश्यक आहे.

३) प्रधान कार्यालयाशिवाय बँकेच्या दहा शाखामार्फत बँक आपली प्रगती करीत आहे. बँकेच्या सर्व शाखा उत्तम रीतीने चाललेल्या आहेत. परंतु शाहुपूरी, लक्ष्मीपुरी (कोल्हापूर) व जयसिंगपूर या तीनच शाखांनी प्रचंड प्रगती केल्याचे दिसते. निम्म्यापेक्षा जास्त ठेवी या तीन शाखेतच जमा झालेल्या आहेत. कर्ज वितरणही जास्त आहे. तुलनेने बाकीच्या शाखांचे व्यवहार व प्रगती कमी झाल्याचे दिसते. त्यादृष्टीने विचार करता इतर शाखाकडे अधिक लक्ष दिल्यास बँकेची आणखी प्रगती होऊ शकेल.

४) बँकेने नवीन काही तरी करून दाखविण्याच्या हेतूने महिला सेवा विभाग स्वतंत्रपणे शाहुपुरी शाखेत सुरू केला आहे. तसाच प्रयोग जयसिंगपूर शाखेत सुरू करणे उचित ठरेल.

५) बँकेचा वाढता व्याप लक्षात घेता अधिकाधिक सेवक वर्गाला प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करून देणे निकडीचे वाटते तसेच आवश्यकते-प्रमाणे प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची नियुक्ती कायम स्वरूपी सेवक म्हणून केल्यास बँकेला त्याचा लाभ होऊ शकेल.

वर मांडलेल्या सुचना व्यावहारिक दृष्टिकोनातून मांडलेल्या आहेत. त्या अंमलात आणणे अवघड नाही. त्यामुळे बँकेची लाभप्रदता व उपयुक्तता वाढण्यास मदतच होईल.

## ६.४ सारांश :

नागरी सहकारी बँकांची कार्यपध्दती लोकाभिमुख आहे हे निःसंशय आहे.आपल्या दैनंदिन कामातून काही अडथळे येत असले तरी ते दूर करणे हे व्यक्तीगत बँकेचे कर्तव्यच आहे. तथापि धोरण म्हणून काही गोष्टी बदलल्या गेल्या की, त्याचा परिणाम संबंध बँक व्यवसायावर झाल्यावाचून राहात नाही. यासाठीच शिखर संस्था असणे आवश्यक असते. शेवटी नागरी बँकांनी राजकारण कमी करून अर्थकारण व्यवस्थित हाताळल्यास सबंध सहकारी चळवळीच्या यशाचे श्रेय साखर कारखान्या पाठोपाठ नागरी सहकारी बँकांना मिळेल, हे निर्विवाद सत्य आहे.

## संदर्भ ग्रंथ सूची

बर्डे शंकर दामोदर - नागरी सहकारी बँका कार्य आणि कार्यपध्दती,
मॅजिस्टीक प्रकाशन, मुंबई, जानेवारी, १९८७.

बेदी, आर.डी.,- थेअरी, हिस्टरी अँन्ड प्रॅक्टीस ऑफ को-ऑपरेशन,
इंटरनॅशनल पब्लीशिंग हाऊस, मीरत (उ.प्रदेश), १९७७.

चौगुले, व्ही.टी. - भारतीय सहकारी बँकिंग, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे,
१९८०.

गर्ग, एस.सी. - इंडियन बँकींग कॉस्ट अँन्ड प्रॉफिटॅबिलिटी, अनमोल
पब्लिकेशन, न्यू दिल्ली, १९८९.

हाजेला, टी.एन. - प्रिन्सिपल प्रॉब्लेम्स अँन्ड प्रॅक्टीस ऑफ को-ऑपरेशन,
शिवलाल अग्रवाल आणि कंपनी, आग्रा, १९७३

कुंदेन, ह.ना. - नागरी सहकारी बँक व्यवस्थापन आणि विकास, संजय
प्रकाशन, पुणे, १९८९.

कामत गो.स. - सहकार तत्व, व्यवहार आणि व्यवस्थापन, श्री प्रिया
प्रकाशन, पुणे, १९८०.

मुनशी, के.जी. - फिनानशियल मॅनेजमेंट टेक्निक्स (अ स्टडी ऑफ अर्बन
को-ऑपरेटिव्ह बॅन्क्स), अनमोल पब्लिकेशन, न्यू दिल्ली, १९९०.

माथूर, बी.एस. - को-ऑपरेशन इन इंडिया, साहित्य भवन, आग्रा, १९८५.

भाडगोंडे, गुरुनाथ - सामाजिक संशोधक पध्दती, फडके, प्रकाशन, कोल्हापूर

पाटील ज.फा. - अर्थशास्त्रीय संशोधनाची तोंडओळख, कॉन्टिनेंटल प्रकाशन,
पठाण के.जी. पुणे ३०, १९७९.
ताम्हणकर पी.जे.

## नियतकालिके

सहकारी महाराष्ट्र - महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित, पुणे

सहकारी प्रबोधन - गणी फरास (संपादक) जिल्हा सहकारी बँका विशेषांक, नवरंग मुद्रणालय, शिवाजी पेठ, कोल्हापूर

अर्थसंवाद - मराठी अर्थशास्त्र परिषद, धुळे.

इंडियन को-ऑपरेटिव्ह रिव्ह्यू - नॅशनल को-ऑप. युनियन ऑफ इंडिया

सहकारी विश्व - डॉ. सच्चिदानंद शिरोडकर (संपादक), लक्ष्मीपुरी, कोल्हापूर

योजना (मराठी), मुंबई

स्टॅटिस्टीकल इनफॉर्मेशन ऑफ अर्बन को-ऑप. बँक इन महाराष्ट्र, मुंबई.

सहकारी बँक डायरी, १९९१, १९९२ - श्री. सदानंद वैद्य, जॉली ऑफसेट, मुंबई.

कॉमर्स, मुंबई.

दैनिक सकाळ, पुणे-कोल्हापूर

दैनिक पुढारी - कोल्हापूर

दैनिक महाराष्ट्र टाईम्स, मुंबई

दैनिक केसरी, सांगली

## वार्षिक अहवाल व स्मरणिका


१) श्री. महावीर को-ऑप. बँक लि., कोल्हापूर वार्षिक अहवाल, १९३७ ते १९९१

२) श्री. महावीर को-ऑप. बँकेचा रौप्य महोत्सवी व सुवर्ण महोत्सवी स्मृती ग्रंथ - १९६८ आणि १९८७

३) दि कोल्हापूर अर्बन को-ऑप. बँकेचा अमृत महोत्सवी स्मृती ग्रंथ, १९८८.

४) शेतकरी सहकारी बँक लि., सांगली चा रौप्य महोत्सवी स्मृती ग्रंथ, १९९०.

५) श्री वारणा सहकारी बँकेची रौप्य महोत्सवी स्मरणिका, १९९१.

६) श्री. महावीर को-ऑप. बँक लि., पोट नियमावली.